
विनम्र अभिवादन



आज जयंती


दैनिक

# व्याघ्र शौर्यम

उशीरा दिलेला न्याय हा अन्यायासारखाच असतो.

epaper.vyaghrashuryam.com vyaghrashuryam.com vyaghrashuryam@gmail.com

विनम्र अभिवादन



आज जयंती

■ जळगाव ■ वर्ष - 1 ■ अंक - 1 ■ गुरूवार, दि.02 ऑक्टोबर 2025 Reg. No.MHMAR/25/A2382 ■ पाने - 4 ■ किंमत रु.5


संपादकीय

## व्याघ्र शौर्यमची गर्जना

आजचा दिवस आमच्यासाठी ऐतिहासिक आहे. आपल्या समोर **व्याघ्र शौर्यम** दैनिकाचा पहिला अंक सादर करताना आमच्या मनात अभिमान, जबाबदारी आणि त्याहून अधिक एका दृढ निश्चयाची जाणीव आहे. एखाद्या वृत्तपत्राचा जन्म हा केवळ छापील अक्षरांचा आरंभ नसतो; तो समाजाच्या अंतःकरणातील भावनांना वाचा फोडणारा, अन्यायाविरुद्ध लढा देणारा आणि सत्याला प्रखर प्रकाशात उभे करणारा क्षण असतो.

आमच्या दैनिकाचे ब्रीदवाक्य आहे **उशीरा दिलेला न्याय हा अन्यायासारखा असतो** हे केवळ एक वाक्य नाही, तर आपल्या काळातील कटू वास्तवाला भिडणारी गर्जना आहे. समाजात न्याय मिळण्याची प्रक्रिया जशी लांबत जाते, तसा तो न्याय नष्ट होतो. न्यायालयीन पद्धतीतील विलंब, प्रशासनातील ढिलाई, भ्रष्टाचाराचे ओझे आणि राजकीय स्वार्थांची गुंतागुंत यामुळे सामान्य माणसाच्या आयुष्यातील असंख्य प्रश्न अनुत्तरित राहतात. अशा परिस्थितीत **व्याघ्र शौर्यम** हे दैनिक म्हणजे फक्त वृत्तपत्र नाही, तर न्यायाच्या गजराचे रणशिंग आहे. पत्रकारिता हा लोकशाहीची चौथी स्तंभ आहे असे आपण नेहमी म्हणतो. पण या स्तंभाला खरोखर बळ देण्यासाठी त्यात सत्य, धैर्य आणि जबाबदारी या तीन मूल्यांची निष्ठा आवश्यक आहे. आजची माध्यमे कधीकधी बाजारपेठेच्या प्रभावाखाली, तर कधीकधी राजकीय दबावाखाली काम करताना दिसतात. परंतु खरी पत्रकारिता ही जनतेच्या बाजूने ठामपणे उभी राहणारी असते.

**व्याघ्र शौर्यम**ची वाटचाल या मूल्यांवर आधारित असेल. आम्ही आमच्या वाचकांना केवळ बातम्या देणार नाही, तर त्या बातम्यांच्या मागील सत्य शोधण्याचा धाडसी प्रयत्न करणार आहोत. प्रश्न विचारणारी, सत्तेला जबाबदार धरणारी आणि जनतेच्या मनातील वेदना व आशा दोन्हींचे प्रतिनिधित्व करणारी ही आमची पत्रकारिता असेल. भारतासारख्या प्रचंड लोकसंख्या असलेल्या देशात लाखो प्रकरणे न्यायालयात प्रलंबित आहेत. एखाद्या सामान्य शेतकऱ्याला जमिनीच्या हक्कासाठी, एखाद्या कामगाराला त्याच्या वेतनासाठी तर एखाद्या स्त्रीला तिच्या सन्मानासाठी न्याय मागावा लागतो. पण तो न्याय कधी कधी दहा-दहा वर्षे मिळत नाही. एवढ्या वर्षांच्या प्रतिक्षेनंतर मिळालेला निकाल हा केवळ कायदेशीर निर्णय असतो, परंतु तो त्या व्यक्तीच्या आयुष्यातील नुकसान भरून काढू शकत नाही. हा अन्यायाचा चेहरा आहे. म्हणूनच आम्ही हे ब्रीदवाक्य आत्मसात केले आहे. आम्हाला ठाऊक आहे की पत्रकारीतेतून त्वरित न्याय देता येत नाही, पण अन्यायकारक गोष्टी समोर आणून समाजाच्या विवेकाला जागे करता येते. जबाबदार अधिकाऱ्यांना धडा शिकवता येतो आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे पीडित व्यक्तीला तिच्या लढ्याला साथ देता येते.

आमच्या नावातच आमची दिशा स्पष्ट आहे **व्याघ्र शौर्यम...** वाघ हे धैर्य, सजगता आणि न्यायाचे प्रतीक आहे. समाजातील दुर्बल घटकांच्या वेदनांना आवाज देणे, अन्याय करणाऱ्यांवर वाघासारखे धावून जाणे आणि सत्याला निर्धाराने सामोरे जाणे ही आमची भूमिका असेल. आम्ही शेतकरी, कामगार, विद्यार्थी, महिला, लहान व्यापारी, बेरोजगार युवक या सर्व घटकांच्या समस्या समोर आणणार आहोत. त्याचबरोबर समाजात होत असलेल्या सकारात्मक घडामोडींनाही तितक्याच गांभीर्याने प्रसिद्ध करणार आहोत. कारण पत्रकारितेचा हेतू केवळ दोष दाखवणे नाही, तर प्रेरणा देणेही आहे.

लोकशाही जिवंत राहते ती जनतेच्या जागरूकतेवर आणि जनता जागरूक राहते ती सत्य माहितीच्या आधारावर. आज सोशल मीडियाच्या युगात खोट्या बातम्यांचा आणि अफवांचा पूर आला आहे. यामुळे समाजात गोंधळ निर्माण होतो. व्याघ्र शौर्यम वाचकांना सत्य, तपासून पाहिलेली आणि जबाबदारीने सादर केलेली माहिती देण्याचे वचन देतो. आमच्यासाठी एकही वाचक फक्त ग्राहक नाही. प्रत्येक वाचक हा आमच्या कुटुंबाचा भाग आहे. त्यांच्या विश्वासावरच हे दैनिक उभे आहे. त्यामुळे विश्वास गमावू नये, ही आमच्यासाठी सर्वांत मोठी जबाबदारी आहे.

**व्याघ्र शौर्यम**चा प्रवास सत्याग्रही परंपरेतून प्रेरित आहे. महात्मा गांधींनी अहिंसेच्या मार्गाने सत्यासाठी लढा दिला, तर लालबहादूर शास्त्रींनी साधेपणातून नेतृत्व दिले. लोकहितासाठी काम करणाऱ्या या सर्व नेत्यांनी दाखवलेली मूल्ये आम्ही आत्मसात करणार आहोत. पत्रकारिता ही एक प्रकारची जनसेवा आहे, आणि ती सेवा मनापासून करण्याचा आमचा प्रयत्न असेल. आजचा युवक प्रश्न विचारतो, उत्तरांची मागणी करतो. त्याच्या हातात मोबाईल आहे, त्याच्या डोळ्यासमोर संपूर्ण जग आहे. परंतु या महासागरात सत्याची मोती शोधणे कठीण झाले आहे. युवकाला योग्य दिशा देणे, त्याला खरे आणि खोटे यातील फरक दाखवणे ही आमची जबाबदारी आहे. आम्ही युवकांसाठी शिक्षण, रोजगार, स्टार्टअप्स, नवोन्मेष यासारख्या विषयांवर विशेष लक्ष केंद्रित करू. कारण न्याय ही केवळ न्यायालयीन बाब नसून, तो आर्थिक, सामाजिक आणि शैक्षणिक संधींमध्येही असतो.

जळगावसारख्या जिल्ह्यापासून ते राज्यभरातील ग्रामीण भागात शेतकरी अजूनही नैसर्गिक आपत्ती, कर्जबाजारीपणा आणि बाजारपेठेच्या अन्यायाविरुद्ध लढतो आहे. त्याचा आवाज मोठ्या शहरांत पोहोचत नाही. व्याघ्र शौर्यम या शेतकऱ्यांचा आवाज ठरेल. त्यांचे प्रश्न, त्यांची संघर्षकथा, त्यांची आशा हे आम्ही प्रत्येक अंकातून मांडणार आहोत. आज आम्ही आमच्या वाचकांसमोर नतमस्तक होऊन हे आश्वासन देतो, आम्ही सत्याचा मार्ग कधीच सोडणार नाही. अन्यायाविरुद्ध निर्भीडपणे उभे राहू. लोकशाही मजबूत करण्यासाठी आमची लेखणी वापरू,

उशीरा मिळणाऱ्या न्यायाला अन्याय ठरवणाऱ्या प्रत्येक घटनेला समाजासमोर आणू.

प्रिय वाचकहो,

**व्याघ्र शौर्य**म हे फक्त एक दैनिक नाही, तर हे तुमच्या आशा-आकांक्षांचे, संघर्षांचे आणि स्वप्नांचे आरसे आहे. तुमचा विश्वास हे आमचे सर्वात मोठे बळ आहे. आमच्यासोबत रहा, आम्हाला दिशादर्शक बना, आमच्या चुका दाखवा आणि सत्यासाठी एकत्र उभे राहा. कारण उशीरा दिलेला न्याय हा अन्यायासारखा असतो आणि हा अन्याय रोखण्यासाठीच व्याघ्र शौर्यमचा पहिला गर्जना आज ऐकू येतो आहे.

---


### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची मोठी घोषणा । ओला दुष्काळाच्या सर्व सवलती लागू

# दिवाळीपूर्वी शेतकऱ्यांनी मिळणार थेट मदत!

मुंबई प्रतिनिधी

राज्यातील बहुतांश जिल्ह्यात गेल्या १५ दिवसांत झालेल्या मुसळधार पावसामुळे शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झाले आहे. त्यात, मराठवाड्यातील लातूर, धाराशिव, नांदेड, बीड, परभणी, संभाजीनगर जिल्हे आणि पश्चिम महाराष्ट्रातील सोलापूर जिल्हा तर उत्तर महाराष्ट्रातील जळगाव जिल्ह्यात शेतकऱ्यांची पिके पाण्यात गेली असून मोठा फटका शेतकऱ्यांना बसल्याचे दिसून येत आहे. त्या पार्श्वभूमीवर मंत्रिमंडळ बैठकीत काही निर्णय होणार का, याची अपेक्षा शेतकऱ्यांना होती. दरम्यान, मंत्रिमंडळ बैठकीत पूरस्थितीचा आढावा घेण्यात आला असून दिवाळीपूर्वी शेतकऱ्यांना मदत देण्याचा पूर्ण प्रयत्न राहिल, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जाहीर केले. तसेच, मॅन्यूअलमध्ये ओला दुष्काळ ही संकल्पनाच नाही, तरीही दुष्काळाच्या सर्व सवलती लागू केल्या जातील असे म्हणत एकप्रकारे ओला दुष्काळच जाहीर करण्यात आला आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडवीस म्हणाले की, राज्य मंत्रिमंडळ बैठकीत महत्वाचे निर्णय घेण्यात आले आहेत. राज्यात गेल्या काही दिवसांत अतिवृष्टी झाली आहे, यासंदर्भात आढावा घेतला असून ६० लाख हेक्टरवरती नुकसान झाल्याचा प्राथमिक



अंदाज आहे. त्यासाठी, पहिल्या टप्प्यात आपण २११५ कोटी रुपये शेतकऱ्यांना वितरीत करण्याची कामे सुरू झाले आहेत. काही ठिकाणी पाणी असल्यामुळे योग्य प्रकारचा असेसमेंट घेता येत नव्हते आणि म्हणून त्यांना अधिकचा वेळ आपण दिलाय पुढच्या दोन-तीन दिवसात ही सगळी माहिती पोहोचेल त्यानंतर शेतकऱ्यांना करावयाची मदत असेल. जसे की खरडून गेलेली जमीन आहे, त्याच्याकरता करायची मदत असेल विहिरींच्या संदर्भात करायची मदत असेल, घरांच्या संदर्भातली मदत असेल, तातडीची मदत जी आपण सुरू केली आहे, त्या संदर्भातले निर्णय असतील. वेगवेगळ्या प्रकारे ज्या ज्या प्रकारचे नुकसान झालेले आहे, त्या सगळ्या नुकसानाच्या संदर्भात एक कॉम्प्रिएनसीव पॉलिसी तयार करून आणि ही सगळी जी काही मदत आम्ही करणार आहोत ही पुढच्या आठवड्यामध्ये घोषणा आम्ही करून आणि शक्यतो शेतकऱ्यांना दिवाळीपूर्वी त्यांच्या खात्यामध्ये ही मदत मिळाली पाहिजे अशा प्रकारचा प्रयत्न आम्ही करणार आहोत, असे देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

मंत्रिमंडळाने काही निर्णय घेतलेले आहेत. त्यामध्ये, सातत्याने ओला दुष्काळाची मागणी होत असते पण मॅन्युअलमध्ये ओला दुष्काळ कुठेही नाही. आजपर्यंत कधी ओला दुष्काळ जाहीर झालेला नाही तथापि आम्ही हा निर्णय घेतला की, ज्यावेळी दुष्काळ पडतो त्यावेळी ज्या ज्या उपाययोजना, सवलती आपण देतो त्या सगळ्या सवलती आता तशाच प्रकारची दुष्काळी टंचाई पडली आहे असे समजून त्या सगळ्या सवलती याही वेळी लागू करण्याचा निर्णय हा राज्याच्या मंत्रिमंडळाने घेतला आहे, अशी माहितीही मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिली. त्यामुळे, जी काही मागणी होती की त्यावेळच्या सवलती लागू झाल्या पाहिजेत किंवा ओला दुष्काळ जाहीर करायचा अर्थ असतो की त्या सवलती लागू करा, तशा सगळ्या सवलती या लागू करण्याचा निर्णय हा राज्याच्या मंत्रिमंडळाने घेतलेला आहे. आता ही सगळी नुकसानाची आकडेवारी जमा होते की पूर्ण जमा पुढच्या दोन-तीन-चार दिवसात होईल. जसे मी सांगितले लवकरात लवकर, पण कुठल्याही परिस्थितीत पुढच्या आठवड्याच्या आत आपल्याला या संदर्भातली संदर्भातला निर्णय घेणार आहोत आणि त्या संदर्भातली घोषणा आम्ही करू, असेही फडणवीसांनी स्पष्ट केले.

#### कर्करोगावर मोफत उपचारासाठी योजना

राज्याच्या मंत्रिमंडळाने काही महत्त्वपूर्ण या ठिकाणी निर्णय केलेले आहेत. ज्याच्यामध्ये राज्याची एक सर्वंकष कॅन्सर सेवा पॉलिसी कॉम्पियन्स कॅन्सर केअर पॉलिसी आपण तयार केलेली आहे. या कॅन्सर केअर पॉलिसीच्या माध्यमातून राज्यातल्या सगळ्या जिल्ह्यांना कॅन्सरच्या उपचार हा उपलब्ध राहिला पाहिजे अशा प्रकारची याची रचना करण्यात आलेली आहे. यात सेंटर आणि एल थ्री सेंटरचे जाळ आपण तयार करत आहोत, जेणेकरून कोणालाही कॅन्सरसारख्या या बिमारीची ट्रीटमेंट मिळण्याकरता त्यांच्या जिल्ह्यामध्येच जवळपास महत्त्वाच्या गोष्टी उपलब्ध असतील, काहींना काही गोष्टींकरिता सेंटरला काही ठिकाणी जावे लागेल. पण, याच्यामुळे खूप मोठ्या प्रमाणात कॅन्सरचे जे रोगनिदान आहे, त्याच्यावर उपचार आहेत. त्याची सुलभता आणि त्याची कॉस्ट कमी करणे हा याच्या पाठीमागचा उद्देश आहे, असेही मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

---

## कांदिवली आगीत सहा महिलांचा मृत्यू

मुंबई प्रतिनिधी

कांदिवली येथील केटरिंग किचनला लागलेल्या आगीत गंभीर जखमी झालेल्या सर्व सहा महिलांचा मृत्यू झाला आहे. मंगळवारी सकाळी ७० टक्के भाजलेल्या जानकी गुप्ता (३९) आणि ९० टक्के भाजलेल्या दुर्गा गुप्ता (३०) यांचा ऐरोली येथील नॅशनल बर्न्स सेंटरमध्ये मृत्यू झाला, असे डॉ. शिल्पा कर्णिक आणि बीएमसी आपत्ती व्यवस्थापन पथकाने सांगितले.


यापूर्वी शिवानी गांधी, रक्षा जोशी, नीतू गुप्ता आणि पूनम यांचा मृत्यू झाला आहे. या आगीत मनाराम कुमावत वाचले आहेत, ज्यांचे शरीर ४० टक्के भाजले होते. सध्या त्यांची प्रकृती स्थिर आहे आणि त्यांच्यावर ऐरोलीतील बर्न सेंटरमध्ये उपचार सुरू आहेत. कांदिवली येथील आकुर्ली क्रॉस रोड क्रमांक ३ वर असलेल्या शिवानी केटरर्स नावाच्या केटरिंग किचनमध्ये बुधवार दि. २४ सप्टेंबर रोजी आग लागली. सहा महिलांसह एकूण सात जण गंभीर भाजले. बोरिवली येथील ईएसआयसी आणि ऑम हॉस्पिटलमध्ये प्राथमिक उपचारानंतर, सर्व पीडितांना ऐरोली येथील नॅशनल बर्न्स सेंटर आणि कस्तुरबा हॉस्पिटलमध्ये हलविण्यात



आले. कांदिवलीतील राम किसन मेस्त्री चाळ येथे २४ सप्टेंबर रोजी सकाळी ९:०५ वाजता आग लागली.

दोन दिवसांपूर्वीच केटरिंग किचन त्या दुकानात हलवण्यात आले होते. त्याआधी, त्याच चाळमधील जवळच्या दुसऱ्या दुकानातून ते चालवले जात होते. मुंबई अग्निशमन दलाच्या (एमएफबी) मते, एलपीजी गॅस गळतीमुळे आग लागली, ज्यामुळे सिलेंडरचा स्फोट झाला. दुकानाचे क्षेत्रफळ फक्त १०१२ चौरस फूट होते. आत असलेले सर्व सातही लोक गंभीर जखमी झाले होते. अधिकाऱ्यांनी असेही उघड केले की दुकानाकडे अग्निसुरक्षा प्रमाणपत्र (एनओसी) नव्हते किंवा स्थानिक नागरी वॉर्ड कार्यालय आणि पोलिसांकडून आवश्यक परवानग्या नव्हत्या. समता नगर पोलिसांनी दुकान मालक योगेंद्र मिस्त्री आणि मृत केटरिंग व्यवसाय मालक शिवानी गांधी यांच्याविरुद्ध एफआयआर (प्रथम माहिती अहवाल) दाखल केला.

---



### कुटुंबात गृहिणीचे योगदान अमूल्य

मुंबई प्रतिनिधी

गृहिणींचे कुटुंबातील महत्त्वपूर्ण आणि अमूल्य योगदान विचारात घेऊन राजस्थान उच्च न्यायालयाच्या डॉ. न्यायमूर्ती नुपूर भाटी यांच्या खंडपीठाने मोटर अपघात दावा न्यायाधिकरणाने दिलेल्या नुकसानभरपाईच्या रकमेत वाढ केली. एका गृहिणीच्या अपघाती मृत्यूसंबंधीच्या प्रकरणी उच्च न्यायालयाने सर्वोच्च न्यायालयाच्या निकालांचाही दाखला दिला.

---

## रेपो दर सलग दुसऱ्यांदा स्थिर!

### आरबीआयचा निर्णय : गव्हर्नर संजय मल्होत्रा यांची माहिती

मुंबई प्रतिनिधी

आरबीआयचे गव्हर्नर संजय मल्होत्रा यांनी प्रसारमाध्यमांना केलेल्या संबोधनात रेपो दर सलग दुसऱ्यांदा स्थिर ठेवण्याचा निर्णय घेतला असल्याचे स्पष्ट केले आहे. २९ सप्टेंबर ते ३१ ऑक्टोबर दरम्या न झालेल्या तीन दिवसीय प्रदीर्घ बैठकीनंतर बहुमताने हा निर्णय वित्तीय पतधोरण समितीने घेतल्याचे मल्होत्रा यांनी स्पष्ट केले आहे. त्यामुळे हा दर आता ५.५० टक्के वर कायम राहणार आहे. यापूर्वी अर्थतज्ज्ञ रेपो दर स्थिर राहिल का यावर विभागलेले होते तर दुसरीक डे काही अहवालातील



माहितीनुसार, रेपो दर २५ बेसिस पूर्णांकाने कपात होईल अशी अटकळ बांधली जात होती.

अंतिमतः सध्याची आर्थिक परिस्थिती पाहता गव्हर्नर संजय मल्होत्रा यांनी या स्थिर दर ठेवण्याचा निर्णय घेतला गेला आहे. यापूर्वीही दर स्थिर ठेवण्याचा निर्णय घेतला गेला तत्पूर्वी मात्र रेपो दर अनपेक्षितपणे ५० बेसिस पूर्णांकाने कपात करण्याचा निर्णय आरबीआयने घेतला होता. तसेच यावेळी अर्थव्यवस्थेतील सक्षमीकरण करण्यासाठी बँकेच्या व परदेशी चलनाचे उत्थान करण्याचा विशेष निर्णय आरबीआयने घेतला आहे. रूपयांचे आंतरराष्ट्रीयकरण करण्यासोबतच नेपाळ, भूतान, श्रीलंका या देशांना रूपयांत कर्ज देण्याचा निर्णय असेल अथवा फेमा असेल अथवा युसीबी यांचे पुनः प्रमाणिकरण असे महत्वपूर्ण निर्णय मल्होत्रा यांनी घेणार असल्याचे स्पष्ट केले. आपली अर्थव्यवस्था जागतिक अस्थिरतेतही सक्षम आहे. किरकोळ व हेडलाईन्स महागाई लक्ष्य पातळीच्या आतच होती असेही त्यांनी यावेळी स्पष्ट केले.

---

## तगादा लावणाऱ्या बँकवाल्यांना बदडून काढा!

### विजय वडेट्टीवारांचे खळबळजनक वक्तव्य

नागपूर प्रतिनिधी

नगर, धाराशीवमध्ये पुरामुळे अतोनात नुकसान झाले असतानाही बँकांनी कर्जवसुलीच्या नोटीस दिल्या. अशा नोटीस देणाऱ्या बँकवाल्यांना बदडून काढा. त्यांच्यासोबत सरकारचा माणूस येत असल्यास त्यालाही ठोकून काढा. प्रसंगी कायदा हातात घ्या, असे खळबळजनक वक्तव्य काँग्रेसचे विधिमंडळ नेते विजय वडेट्टीवार यांनी केले.

राज्यातील पूरपरिस्थितीवर वडेट्टीवार



यांनी माध्यमांशी संवाद साधला. ते म्हणाले, राज्यात सप्टेंबर महिन्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे तब्बल २४ जिल्ह्यांतील १३७ तालुके बाधित झाले आहेत. केवळ सप्टेंबर महिन्यातील पिकांचे नुकसान २६ लाख हेक्टरवर गेले आहे. अशावेळी बँकेकडून शेतकऱ्यांकडून कर्जवसुलीची नोटीस कशी काय देण्यात आली, असा सवालही त्यांनी केला.

#### दुष्काळ जाहीर करा!

राज्यात तातडीने ओला दुष्काळ जाहीर करून बाधित शेतकरी आणि सामान्य नागरिकांसाठी सरसकट, आर्थिक मदत आणि पुनर्वसन पॅकेज जाहीर करावे. शेतकऱ्यांचे कर्ज माफ करावे. पिके आणि मालमत्तेचे योग्य मूल्यमापन करून नुकसानभरपाई देण्यात यावी, अशी मागणी काँग्रेसने केली आहे.

---

### सरकारचा आणखी एक नियम लागू । बोगस लाभार्थी शोधण्यासाठी मोहिम

# लाडकी बहीण योजनेसाठी केवायसी बंधनकारक

मुंबई प्रतिनिधी

विधानसभा निवडणुकीत महायुतील भरघोस मते मिळवून देणाऱ्या लाडकी बहीण योजनेतील बोगस लाभार्थी हुडकून काढण्यासाठी गेल्या काही दिवसांपासून युद्धपातळीवर मोहीम सुरु आहे. लाडकी बहीण योजनेमुळे राज्य सरकारच्या तिजोरीवर प्रचंड मोठा आर्थिक भार पडत आहे. त्यामुळे आता राज्य सरकारने लाडकी बहीण योजनेतील बोगस लाभार्थी शोधण्यासाठी युद्धपातळीवर मोहीम हाती घेतली आहे. विधानसभा निवडणुकीच्या काळात मतांच्या बेगमीसाठी राज्य सरकारने या योजनेसाठीचे निकष काटेकोरपणे पाळले जात आहेत की नाही, याकडे फार लक्ष दिले नव्हते. मात्र, आता लाडकी बहीण योजनेचा




आर्थिक भार सोसेनासा झाल्यानंतर राज्य सरकारने प्रत्येक निकषाची कठोर अंमलबजावणी करुन लाखो बोगस लाभार्थ्यांना बाहेरचा रस्ता दाखवला आहे. यानंतर आता राज्य सरकारने लाडकी बहीण योजनेसाठी आणखी एक महत्त्वाचा नियम लागू केला आहे. त्यामुळे लाडकी बहीण योजनेतील महिला लाभार्थ्यांची संख्या आणखी घटण्याची शक्यता आहे. या योजनेतील लाभार्थ्यांच्या सोबतच पती किंवा वडिलांची ई केवायसी करणे बंधनकारक करण्यात आले आहे.

लाडकी बहीण योजनेतील महिला लाभार्थीसोबतच त्या महिलेचे पती किंवा वडिलांचेही वार्षिक उत्पन्न किती आहे, याचीही आता राज्य सरकारकडून पडताळणी केली जाणार आहे. जर महिलेचे लग्नं झाले असेल तर पतीचं आणि लग्न झाल नसेल तर वडिलांचे उत्पन्न शोधले जाणार आहे. लाभार्थी महिलेच्या उत्पन्नासह वडील किंवा पतीचे उत्पन्न अडीच लाखांपेक्षा जास्त असल्यास संबंधित महिलेला लाडकी बहीण योजनेसाठी अपात्र ठरवले जाईल. लाडकी बहीण योजनेसाठी कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न अडीच लाखापेक्षा जास्त नसावा, अशी मुख्य अट आहे. अनेक पात्र झालेल्या महिलांचे उत्पन्न कमी आहे. मात्र लग्न झाले असेल तर पतीचे आणि लग्न झाले नसेल तर वडिलांचे उत्पन्न याचीही चौकशी केली जाणार आहे.

#### उत्पन्न शोधण्यासाठी केवायसी

याआधी लाभार्थी महिलांचे उत्पन्न शोधण्यात आले होते. मात्र, त्यात गृहिणी आणि बहुतांश महिलांचे उत्पन्न अडीच लाखांच्या वर नसल्याचे आढळून आले होते. त्यामुळे आता राज्य सरकारने त्यांच्या कुटुंबाचे एकूण उत्पन्न शोधण्यासाठी पती किंवा वडिलांची ई केवायसी बंधनकारक केले आहे.

दैनिक व्याघ्र शौर्यम
Smart City
जळगाव ▪ गुरुवार, दि.02 ऑक्टोबर 2025

# राहुल गांधींना जीवे मारण्याची धमकी

नवी दिल्ली ✍ वृत्तसंस्था

विरोधी पक्षनेते आणि काँग्रेसचे खासदार राहुल गांधी यांना एका टीव्ही चॅनलवर आयोजित करण्यात आलेल्या चर्चेमध्ये जीवे मारण्याची धमकी देण्यात आली आहे. या संदर्भात आता काँग्रेस पक्षाकडून केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांना एक पत्र लिहिण्यात आलं आहे. या प्रकरणात तातडीनं कारवाई करावी अशी मागणी या पत्राद्वारे करण्यात आली आहे. काँग्रेसचे नेते केसी वेणुगोपाळ यांनी गृहमंत्र्यांना हे पत्र लिहिलं आहे. केरळच्या एका न्यूज चॅनलवर लडाखमध्ये उफाळलेल्या हिंसाचारावर चर्चा सुरू होती. या कार्यक्रमात भाजपची बाजू मांडताना एबीव्हीपीचे माजी अध्यक्ष पिंटू महादेव यांनी म्हटलं की, काँग्रेसचे खासदार राहुल गांधी यांना गोळी मारली जाईल. पिंटू महादेव हे अनेक चॅनलवर भाजपची बाजू मांडताना दिसतात.



## झटपट बातम्या...

### अस्मिता जिल्हास्तरीय योगासन सिटी लीगचे उद्घाटन



जळगाव ✍ प्रतिनिधी

येत्या वर्षभरात खेलो इंडिया स्कूल गेम्सच्या माध्यमातून योगा खेळ स्पर्धेला सुरवात होऊन शालेय विद्यार्थ्यांकरिता १२ प्रकारात योग खेळ सुरु होतील आणि ऑलम्पिक मध्ये मोठ्या संख्येने मेडल भारताला मिळतील असे आश्वासक प्रतिपादन योगासन भारतचे उपाध्यक्ष तथा महाराष्ट्र योगासन स्पोर्ट्स फेडरेशनचे अध्यक्ष डॉ. संजय मालपाणी यांनी खान्देश कॉलेज एज्युकेशन सोसायटी संचलित मूळजी जेठा (अधिकार प्रदत्त स्वायत्त) महाविद्यालयाचे सोहम डिपार्टमेंट ऑफ योग अँड नॅचरोपॅथी, एकलव्य क्रीडा संकुल आणि जळगाव डिस्ट्रिक्ट योगासन स्पोर्ट्स असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने स्पोर्ट्स ऑथॉरिटी ऑफ इंडिया खेलो इंडिया आणि योगासन भारत अंतर्गत 'अस्मिता जळगाव जिल्हास्तरीय योगासन सिटी लीग २०२५- २६' च्या उद्घाटन प्रसंगी मूळजी जेठा महाविद्यालय परिसरातील कान्ह कला मंदिर नवीन ऑडिटोरियम हॉल मध्ये केले. यावेळी आमदार सुरेश भोळे, अध्यक्षस्थानी ॲड. प्रवीणचंद्र जंगले (सहसचिव खानदेश कॉलेज एज्युकेशन सोसायटी), योगासन स्पोर्ट असोसिएशनचे अध्यक्ष सतीश मोहगावकर, केसीई सोसायटी शैक्षणिक संचालक डॉ. मृणालिनी फडणवीस, प्राचार्य प्रा. सं. ना. भारंबे व डॉ देवानंद सोनार उपस्थित होते.

### रोटरी सदस्यांनी घेतले विद्यार्थ्यांचे शैक्षणिक पालकत्व



जळगाव ✍ प्रतिनिधी

येथील रोटरी क्लब ऑफ जळगाव मिडटाऊनच्या सदस्यांनी करंज येथील रामनाथ बाबा प्राथमिक माध्यमिक विद्यालयातील दहावीच्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक दृष्ट्या दत्तक घेत त्यांचे पालकत्व स्वीकारले. विद्यालयातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वितरण देखील करण्यात आले. अध्यक्ष ॲड. किशोर बी. पाटील, मानद सचिव डी.ओ.चौधरी, प्रकल्प समन्वयक छाया पाटील यांच्या नेतृत्वात दिनेश कक्कड, दिलीप गांधी, डॉ. अपर्णा मकासरे, डॉ. किरण सुपे, माधवी असावा यांनी पहिली ते दहावी पर्यंतची विद्यार्थ्यांची फी भरून पालकत्व स्वीकारले. शैक्षणिक साहित्यासाठी सुरेखा शिरुडे, सुधीर चौधरी, प्रा. यशवंत सैंदाणे, डी. ओ.चौधरी, छाया पाटील यांनी आर्थिक योगदान दिले असे पब्लिक इमेज कमिटी चेअरमन डॉ. उषा शर्मा यांनी कळविले आहे.

### अंतर महाविद्यालयीन व्हॉलीबॉल स्पर्धेचे यशस्वी आयोजन



जळगाव ✍ प्रतिनिधी

दरवर्षीप्रमाणे यंदाही कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयांच्या आंतर महाविद्यालयीन स्पर्धा विवेकानंद प्रतिष्ठान पुरस्कृत के.ए.के.पी महाविद्यालयाच्या वतीने आयोजित करण्यात आले. स्पर्धेचे उद्घाटन जामनेर येथील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय जामनेर येथील प्राचार्य प्राचार्य डॉ. राजेंद्र खडायते यांच्या हस्ते करण्यात आले सदर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी के.ए.के.पी संस्थेचे अध्यक्ष विनोद पाटील यांची उपस्थिती लाभली तर प्रमुख अतिथी डॉ. व्ही एस सूर्यवंशी यांची उपस्थिती.लाभली होते. उपस्थित सर्व मान्यवरांचे स्वागत महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. किशोर पाठक व क्रीडा संचालक डॉ. संतोष बडगुजर यांच्या हस्ते करण्यात आले.उद्घाटन प्रसंगी मान्यवरांनी खेळाडूंना मार्गदर्शन केले स्पर्धा निकोप व्हावी व पंचांनी दिलेल्या निर्णयाचे स्वागत करावे आणि स्पर्धा खेळभावनेच्या वातावरणात संपन्न करण्यात यावी असे देखील स्पर्धकांना आवाहन करण्यात आले. सदर स्पर्धेसाठी पुरुषांचे एकूण दहा तर महिलांचे एकुण पाच संघांचा समावेश होता. स्पर्धेत पुरुष गटातून कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय भालोद यांनी प्रथम क्रमांक, लोकसेवक मधुकरराव चौधरी समाजकार्य महाविद्यालय द्वितीय क्रमांक तर मूळजी जेठा महाविद्यालय जळगाव यांना तृतीय क्रमांक प्राप्त झाले आहे. तसेच महिला गटात लोकसेवक मधुकरराव चौधरी समाजकार्य महाविद्यालय, जळगांव पहिला क्रमांक, नूतन मराठा महाविद्यालय, जळगाव., द्वितीय क्रमांक व पीजी युजी जिमखाना, कबचौ उमवी, जळगांव., यांना तृतीय क्रमांक प्राप्त झाला. विजेत्या संघाना आयोजकांतर्फे सन्मानचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले.

# स्त्रीरोग व प्रसूतीशास्त्र विभागात लागली आग

## शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयातील घटना

जळगाव ✍ प्रतिनिधी



येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयातील स्त्रीरोग व प्रसूतीशास्त्र विभागात सोमवारी अचानक आग लागल्याची घटना घडली. शॉर्टसर्किटमुळे उद्भवलेल्या या आगीवर विभागातील अधिपरिचारिका ज्यूलीना पिंपळसे आणि सुवर्णा पुरी यांनी अतिशय प्रसंगावधान राखत अग्निशामक यंत्रांचा वापर करून नियंत्रण मिळवले. त्यांच्या धाडसपूर्ण व तत्पर कृतीमुळे कोणतीही जीवितहानी झाली नाही. याबद्दल अधिष्ठाता डॉ. गिरीश ठाकूर यांनी दोन्ही परिचारिकांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला. प्रसंगी, रुग्णालयातील प्रसुतीपूर्व दाखल कक्ष क्रमांक ६ मध्ये अनेक गर्भवती महिला व त्यांचे नातेवाईक उपस्थित होते. सकाळी १२.२० वाजता मुख्य दरवाज्याजवळील स्विचबोर्डजवळ अचानक स्पार्किंग होऊन आग लागली. घटनेनंतर कर्मचाऱ्यांनी तात्काळ अधिपरिचारिका ज्यूलीना पिंपळसे आणि सुवर्णा पुरी यांना माहिती दिली. दोघींनीही विलक्षण प्रसंगावधान दाखवत त्वरित विभागातील दोन अग्निशामक यंत्र हाताळले आणि आगीवर नियंत्रण मिळवले. या दरम्यान त्यांनी परिसरातील नागरिकांना शांत राहण्याचे आवाहन केले आणि तातडीने विद्युत विभागाशी संपर्क साधून पुढील धोका टाळला. त्यांच्या धाडसी कृतीमुळे रुग्णालयातील इतर कर्मचारी, रुग्ण आणि उपस्थित नातेवाईक यांच्यात घबराट पसरली नाही. घटनेची माहिती मिळताच अधिष्ठाता डॉ. गिरीश ठाकूर यांनी स्वतः याची दखल घेत ज्यूलीना पिंपळसे आणि सुवर्णा पुरी यांना दालनात बोलावले. त्यांना पुष्पगुच्छ देत गौरव करण्यात आला. यावेळी वैद्यकीय अधीक्षक डॉ. धर्मेंद्र पाटील, सहयोगी प्राध्यापक डॉ. संगीता गावित आणि सहायक अधिसेवक तुषार पाटील उपस्थित होते. अशा आपत्कालीन परिस्थितीत वैद्यकीय सेवकांनी दाखवलेली तत्परता ही रुग्णालयासाठी आदर्शवत ठरते. अग्निशमन यंत्रणा योग्य प्रकारे हाताळल्यामुळे आणि रुग्णांची घबराट न होऊ देता परिस्थितीवर नियंत्रण मिळवल्यामुळे मोठा अनर्थ टळला. प्रशासनाकडूनही अशा कर्मचाऱ्यांचे वेळोवेळी कौतुक होणे गरजेचे असल्याचे मत यावेळी व्यक्त करण्यात आले.

## अतिवृष्टीने घर कोसळले

# एका बालकाचा मृत्यू; दुसरा जखमी

पाचोरा ✍ प्रतिनिधी



अतिवृष्टीमुळे शहरातील कृष्णापुरी भागातील टेकडीगल्लीत धाब्याचे घर अतिवृष्टीमुळे कोसळल्याने एक १२ वर्षाचा मुलगा मातीच्या ढिगार्याखाली सापडुन गुदमरून मरण पावला तर दुसरा मुलगा जखमी झाले. मरण पावलेला महेश हा विधवा आईचा एकुलता एक मुलगा असुन तिच्या वृध्दपकाळाची काठी हरपल्यामुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. याबाबत प्राप्त माहीती अशी की, शहरातील कृष्णापुरी येथील टेकडीगल्लीत विठ्ठल काशिनाथ पाटील हे आपल्या मुला सोबत धाब्याच्या घरात राहत असुन त्यांच्याकडे चाळीसगाव तालुक्यातील लोंढे येथे राहणार्या दिपाली नितिन राणे हिचा एकुलता एक मुलगा महेश नितिन राणे (वय - १२) हा राहत होता. २९ रोजी दुपारी महेश नितिन राणे व त्याचा मावसभाऊ योगेश बाळु पाटील हे दुपारच्या सुमारास घरातील मागच्या बाजुस झोपले होते. तर घरातील सर्व सदस्य घराच्या पुढच्या भागात बसलेले होते. दुपारी ३ वाजेच्या सुमारास घराचा मागचा भाग धाब्यासह कोळसल्याने एकच खळबळ उडाली. विठ्ठल पाटील व चंद्रकांत पाटील यांनी तात्काळ गल्लीतील नागरीकांना बोलवुन पडलेल्या घराची माती व लाकडे बाजुला केली. या दरम्यान महेश राणे व योगेश पाटील यांना बाहेर काढण्यात आले.

# जिकरा शाळेतील चित्रकला स्पर्धेच्या विजेत्यांना पारितोषिके

जामनेर ✍ प्रतिनिधी



शहरातील सुप्रसिद्ध जिकरा एज्युकेशन सोसायटी शैक्षणिक संस्थेत संस्थेचे आधारस्तंभ तथा संचालक रहिम शेख व सचिव जाकिर शेख यांच्या हस्ते चित्रकला स्पर्धेचे भव्य उद्घाटन करण्यात आले होते. या स्पर्धे त लहान मुलांपासून ते ज्येष्ठ विद्यार्थ्यांपर्यंत सर्व वयोगटातील स्पर्धकांनी उत्साहाने सहभाग घेतला होता. त्यात रंग, रेषा आणि कल्पनाशक्तीच्या जोरावर विद्यार्थ्यांनी विविध सामाजिक, सांस्कृतिक व नैसर्गिक विषयांचे अप्रतिम चित्रण करून आपली कला सादर केली. आयोजित करण्यात आलेल्या या स्पर्धेत निवड झालेल्या विजेत्यांना जिकरा इंग्लिश स्कूलच्या वतीने आमंत्रित करण्यात आलेल्या मान्यवरांच्या हस्ते आकर्षक पारितोषिके व प्रमाणपत्रे प्रदान करण्यात आले. यावेळी विजेत्या विद्यार्थ्यांचे पालक आणि शिक्षक वर्गाकडून जोरदार अभिनंदन करण्यात आले. कार्यक्रमाला उपस्थित मान्यवरांनी मुलांच्या कलागुणांचे कौतुक करत, "अशा प्रकारच्या उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांची सर्जनशीलता वाढते व त्यांचा आत्मविश्वास दुणावतो," असे मत व्यक्त केले. आयोजक समितीने यापुढेही अशा उपक्रमांचे आयोजन करून विद्यार्थ्यांना कला जोपासण्यासाठी व्यासपीठ उपलब्ध करून देण्याची ग्वाही संस्थेचे संचालक रहिम शेख व जाकिर शेख यांनी देऊन विजेत्यांचे मनापासून कौतुक करुन शुभेच्छा दिल्या विद्यार्थ्यांच्या कल्पकतेने सजलेल्या या सोहळ्यामुळे चित्रकलेप्रती रस असणाऱ्यांना मोठा प्रेरणादायी ठेवा मिळाल्याचे समाधान आयोजकांनी व्यक्त केले.

# गरुड महाविद्यालयात महाविद्यालयीन कुस्ती स्पर्धा

शेंदुर्णी ✍ प्रतिनिधी



कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगाव व आप्पासाहेब रघुनाथराव भाऊराव गरुड कला वाणिज्य विज्ञान महाविद्यालय शेंदुर्णी यांच्या संयुक्त विद्यमाने तसेच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या जन्मदिवसाचे औचित्य साधून सेवा पंधरवाडा उपक्रमांतर्गत अंतर्गत अंतर महाविद्यालयीन कुस्ती स्पर्धाचे आयोजन दिनांक २५ सप्टेंबर रोजी अ. र. भा. गरुड कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय शेंदुर्णी येथे आयोजित करण्यात आले होते. सदर स्पर्धेत १६ महाविद्यालयांनी सहभाग घेतला एकूण ५० पुरुष खेळाडू व १५ महिला खेळाडू यांनी सहभाग नोंदविला सदर स्पर्धेत फ्री स्टाईल क्रीडा प्रकारात आप्पासाहेब रघुनाथराव गरुड महाविद्यालय शेंदुर्णी प्रथम स्थान द्वितीय स्थान इकरा महाविद्यालय जळगांव तृतीय स्थानावर भोळे महाविद्यालय भुसावळ विजयी ठरले तसेच ग्रीको रोमन प्रकारात नूतन मराठा महाविद्यालय प्रथम व व्दितीय स्थानावर गरुड महाविद्यालय शेंदुर्णी व शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय व तृतीय स्थानावर विजयी ठरले तसेच महिला कुस्ती प्रकारात गरुड महाविद्यालय प्रथम स्थानावर, खडसे महाविद्यालय द्वितीय स्थानावर व मू. जे. महाविद्यालय जळगांव तृतीय स्थानावर विजयी झालेत.

# कॉलनी भागात दोन मोटार सायकल चोरी

जामनेर ✍ प्रतिनिधी

शहरातील चोरीच्या घटनांवर नियंत्रण मिळविण्यात पोलिस प्रशासन अपयशी ठरत असल्याचे पुन्हा एकदा स्पष्ट झाले आहे. शहरातील वाकी रोड परिसरातील धनपुष्प कॉलनी कॉलनी भागात दिनांक २६ रोजी मध्यरात्रीच्या सुमारास स्थानिक रहिवासी भिका कोळी तसेच गोविंद चव्हाण यांची दोन मोटार सायकली अज्ञात चोरट्यांनी लंपास केल्या. सुरक्षित मानल्या जाणाऱ्या परिसरातून मोटार सायकली चोरीस जाणे ही अत्यंत गंभीर बाब मानली जात असून, या घटनेने नागरिकांमध्ये मोठी खळबळ उडाली आहे. तसेच माजी नगरसेवक यांची सुद्धा मोटार सायकल भुसावळ रोड वरील स्मशान भुमी येथे अज्ञात चोरटय़ांनी चोरून नेली होती. याच्या सह गेल्या काही दिवसांपासून शहरात वाहनचोरीच्या घटनांत वाढ होत असल्याचे चित्र दिसत आहे. मात्र पोलिसांची गस्त आणि तपास यंत्रणा निष्क्रिय असल्याची चर्चा नागरिकांमध्ये रंगली आहे. सलग दोन मोटार सायकली चोरीस जाऊन चोरट्यांनी पोलिसांना थेट खुले आव्हान दिल्याची भावना निर्माण झाली आहे. या घटनेनंतर परिसरातील नागरिकांत भीतीचे वातावरण पसरले असून, नागरिकांचा पोलिसांवरील विश्वास डळमळीत झाला आहे.

# शैक्षणिक परीक्षा शुल्क माफ करण्याची मागणी

मुक्ताईनगर ✍ प्रतिनिधी



सद्यस्थितीत महाराष्ट्र राज्यात मोठ्या प्रमाणात ढगफुटी सदृश्य पाऊस झालेला आहे. राज्यातील गावांमध्ये पूरजन्य परिस्थिती निर्माण होऊन जनजीवन विस्कळीत झालेले आहे. या पूरस्थितीमुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान झाले आहे. विविध गावांमध्ये, घरामध्ये पाणी शिरले असल्यामुळे शैक्षणिक साहित्याचे मोठे नुकसान झालेले आहे. या सर्व परिस्थितीमुळे महाराष्ट्र राज्यातील शिक्षण घेणाऱ्या सर्व विद्यार्थी, विद्यार्थिनींचे शैक्षणिक शुल्क तसेच परीक्षा शुल्क माफ करण्यात यावे ही मागणी अश्विन सुरवाडे, जिल्हा कार्याध्यक्ष राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेस यांनी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना तहसीलदार मुक्ताईनगर यांच्यामार्फत निवेदनाद्वारे केली. यावेळी प्रवीण राठोड, जिशान बागवान, यश शिरतुरे, शाहिद खान, मुदस्सिर शेख आदी उपस्थित होते.

# नैसर्गिक आपत्तीमुळे बाधित शेतांचे स्पॉट पंचनामे

चाळीसगाव ✍ प्रतिनिधी



दिनांक २७ सप्टेंबर आणि २८ सप्टेंबर रोजी चाळीसगाव तालुक्यात झालेल्या अतिवृष्टी आणि पुरामुळे उद्भवलेल्या नैसर्गिक आपत्तीमुळे मुळे बाधित शेतांचे पंचनामे करण्यासाठी आज दिनांक २९ सप्टेंबर रोजी सकाळी १० वाजता मंडळ अधिकारी, ग्राम महसूल अधिकारी, ग्रामपंचायत अधिकारी तसेच कृषी सहाय्यक आणि नगरपालिकेचे कर्मचारी यांची संयुक्त सभा प्रमोद हिले, उपविभागीय अधिकारी, चाळीसगाव भाग चाळीसगाव यांचे अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आलेली होती. सदर सभेत पंचनामे करणेबाबत प्रशांत पाटील, तहसीलदार चाळीसगाव, अभिषेक लगड, तालुका कृषी अधिकारी चाळीसगाव, अन्सार शेख, गट विकास अधिकारी, पंचायत समिती चाळीसगाव सौरभ जोशी, मुख्याधिकारी, नगरपरिषद चाळीसगाव यांनी सर्व उपस्थित कर्मचारी यांना मार्गदर्शन केले तसेच सदरचे पंचनामे करताना पारदर्शकपणे आणि प्रत्यक्ष शेतात जाऊन झालेल्या नुकसानीचा अंदाज घेऊन करणेबाबत आदेशित केले. तसेच चाळीसगाव शहरात अतिवृष्टी आणि पुरामुळे झालेल्या नुकसानीचे पंचनामे करण्यासाठी नगरपालिका प्रशासन आणि महसूल प्रशासन यांचे संयुक्त पथक स्थापन करून त्यांचे द्वारे पंचनामे करण्याचे काम सुरू करण्यात आलेले आहे. सदर सभेस डॉ. संदेश निकुंभ, महसूल नायब तहसीलदार, बी आर शिंदे, नायब तहसीलदार हे सुद्धा उपस्थित होते.

दैनिक व्याघ्र शौर्यम
हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक शेख रहीम शेख बाबू यांनी लोकशाही ऑफसेट एम-६९, एमआयडीसी जळगाव येथे छापून इस्लाम पुरा, जामनेर, जळगाव, महाराष्ट्र - ४२४२०६ येथे प्रसिद्ध केले. आर.एन.आय.नं. MHMAR/25/A2382
printed by the owner, printer, publisher, editor Sheikh Rahim Sheikh Babu at Lokshahi Offset M-69, MIDC Jalgaon and published at Islam Pura, Jamner, Jalgaon, Maharashtra - 424206. R.N.I. No. MHMAR/25/A2382

# विकासाचा वारकरी!



जळगाव जिल्ह्यातील जामनेर विधानसभा मतदारसंघ हा खान्देशातील एक महत्त्वाचा राजकीय व सामाजिक केंद्रबिंदू मानला जातो. दीर्घकाळ या मतदारसंघाचे प्रतिनिधित्व करणारे, राज्यातील लोकप्रिय नेते, कार्यतत्पर मंत्री आणि भारतीय जनता पक्षाचे प्रभावी नेते गिरीश महाजन यांनी या भागाचा कायापालट घडवून आणला आहे. त्यांची कार्यशैली, लोकसंपर्क आणि विकासाभिमुख दृष्टिकोनामुळे जामनेरचा विकास हा राज्यात आदर्श म्हणून समोर येत आहे.

ङ्गनेता हा जनतेच्या प्रत्येक सुखदुःखात सहभागी असावाफ या तत्त्वावर काम करणारे गिरीश महाजन यांनी आपल्या मतदारसंघाला केवळ निवडणुकीच्या हंगामात नव्हे, तर रोजच्या आयुष्यातही साथ दिली. म्हणूनच आज जामनेरकरांचा त्यांच्या नेतृत्वावर निर्विवाद विश्वास आहे.

कोणत्याही भागाच्या प्रगतीसाठी सर्वप्रथम आवश्यक असते ती उत्तम पायाभूत सुविधा. रस्ते, पूल, पाणीपुरवठा, वीज या गोष्टींवर त्यांनी विशेष लक्ष केंद्रित केले. जळगाव-जामनेर-भुसावळ हा महत्त्वाचा मार्ग रुंदीकरण करून डांबरीकरण करण्यात आला. यामुळे व्यापार, शेतीमालाची वाहतूक आणि प्रवास दोन्ही सोपे झाले. मतदारसंघातील गावोगाव पक्के रस्ते झाले. यामुळे पावसाळ्यात चिखल व अडथळ्यांमुळे होणारा त्रास मोठ्या प्रमाणावर कमी झाला. मोसमी नद्या-नाल्यांवर पूल उभारले गेले. पूर्वी पावसाळ्यात गावांचा संपर्क तुटत असे, पण आता ते सहज साध्य झाले आहे. वीजपुरवठ्यात सुधारणा होण्यासाठी ट्रान्सफॉर्मर बसविणे, जळालेल्या तारा बदलणे, नवीन वीजजाळे घालणे यावर भर देऊन शेतकरी व ग्रामस्थांना अखंडित वीज मिळू लागली.

शेतकऱ्यांचा पाण्याचा प्रश्न सोडवण्यासाठी गिरीश महाजन यांनी अपार परिश्रम घेतले. जामनेर तालुक्यातील लहान मोठ्या नाल्यांवर बंधारे, छोटे धरणे बांधण्यात आली. या कामांमुळे शेकडो हेक्टर जमीन सिंचनाखाली आली. राज्यव्यापी जलयुक्त शिवार योजनेत जामनेर तालुक्याने आदर्श उभारला. नाले खोल करणे, गाळ काढणे, शिवारांत जलसाठा निर्माण करणे, बोअरवेल रिचार्ज इत्यादी उपक्रमांमुळे भूजलपातळी वाढली. घराघरांत नळाने पाणी पोहोचवण्यासाठी ग्रामीण पाणीपुरवठा योजना कार्यान्वित झाली. अनेक गावांत २४ तास पाणीपुरवठा सुरू आहे. मोठ्या धरणांतून पाइपलाईन व कॅनॉलद्वारे सिंचन केले जाऊ लागले. यामुळे पूर्वी कोरडवाहू शेतीवर अवलंबून असणाऱ्या शेतकऱ्यांना दुबार व तिबार पीक घेता येऊ लागले. शेती हा मतदारसंघाचा मुख्य व्यवसाय असल्याने शेतकऱ्यांचा विकास महाजनांच्या धोरणाच्या केंद्रस्थानी राहिला. वीजपुरवठा रात्रीच्या ऐवजी दिवसा सुरू करण्यासाठी प्रयत्न करून शेतकऱ्यांचा त्रास कमी केला. पिकांचे नुकसान झाल्यास शेतकऱ्यांना विमा मिळवून देण्यासाठी जनजागृती केली. आधुनिक तंत्रज्ञान, ड्रिप इरिगेशन, पिकांचा बदलता पॅटर्न याबाबत माहिती देण्यासाठी प्रदर्शने भरवली. शेतकऱ्यांना थेट व चांगल्या दराने बाजारपेठ उपलब्ध करून देण्यात आल्या. गिरीश महाजन शिक्षण क्षेत्राशी निगडीत असल्याने त्यांनी या भागातील शैक्षणिक दर्जा उंचावण्यासाठी मोठे प्रयत्न केले. डिजिटल क्लासरूम, संगणक, विज्ञान प्रयोगशाळा, वाचनालय यासारख्या सुविधा निर्माण झाल्या. अभियांत्रिकी, फार्मसी, बी.एड., कला, वाणिज्य, विज्ञान महाविद्यालये उभारण्यात आली. यामुळे ग्रामीण विद्यार्थ्यांना शहरात न जाता उच्च शिक्षण घेण्याची संधी मिळाली. शिष्यवृत्ती, सायकल योजना, मोफत पुस्तके, वसतिगृह व्यवस्था यावर विशेष भर देण्यात आला. शाळा-कॉलेजांमध्ये क्रीडा स्पर्धा, सांस्कृतिक कार्यक्रमांना चालना देऊन विद्यार्थ्यांचे सर्वांगीण व्यक्तिमत्व घडवले.









आरोग्याच्या क्षेत्रात महाजनांनी जामनेरमध्ये मोठे काम केले. तालुका रुग्णालयाचे आधुनिकीकरण करण्यात आले असून अत्याधुनिक यंत्रसामग्री, डायलिसीस युनिट, आयसीयू सुरू झाले. गावोगाव डॉक्टर, औषधे, प्रसूती केंद्रे उपलब्ध झाली. नेत्र तपासणी, दंत चिकित्सा, महिला व बाल आरोग्य तपासणी शिबिरे आयोजित केली त्यातून हजारो रुग्णांची सेवा करण्यात आली. कोविडच्या काळात ऑक्सिजन, औषधे, कोविड सेंटर उभारणीसाठी त्यांनी प्रचंड मेहनत घेतली.

ग्रामीण भागातील बेरोजगारीचा प्रश्न सोडवण्यासाठी महाजनांनी औद्योगिक विकासावर भर दिला. महिला बचतगटांना कर्ज, प्रशिक्षण, बाजारपेठ उपलब्ध करून दिली. जामनेर परिसरात लघुउद्योग वसाहतीसाठी जागा व सुविधा उपलब्ध करुन देण्यात आल्या. तरुणांना कंपन्यांत थेट नोकरी मिळावी यासाठी रोजगार मेळावे आयोजित केले. फळ प्रक्रिया, डेअरी, कोल्ड स्टोरेज उभारणीसाठी निधी उपलब्ध करुन दिल्याने अनेकांना त्याचा लाभ मिळाला. मंदिरांचे जीर्णोद्धार, यात्रांसाठी रस्ते, पाणी, प्रकाशयोजना, प्रत्येक गावात लोकांसाठी हॉल, कार्यक्रम स्थळे बांधली. युवकांना क्रीडा क्षेत्रात संधी मिळावी म्हणून सोयीसुविधा, क्रीडांगणे व व्यायामशाळा उभारण्यात आल्या. मंत्री गिरीश महाजन यांच्या नेतृत्वाखाली जामनेर मतदारसंघाने गेल्या दोन दशकांत प्रगतीची नवी उंची गाठली आहे. रस्ते, पाणी, सिंचन, शिक्षण, आरोग्य, उद्योग, सामाजिक व सांस्कृतिक क्षेत्रात मोठी उन्नती झाली. आज जामनेर हा प्रगत, आधुनिक व विकासोन्मुख मतदारसंघ म्हणून राज्यात ओळखला जातो. या विकासाचा पाया म्हणजे महाजन यांची कार्यतत्परता, लोकसंपर्क व जनतेबद्दलची बांधिलकी. त्यामुळेच जामनेरकरांच्या मनात ङ्गआपला नेताफ म्हणून त्यांची ओळख घट्ट झाली आहे.




भारताच्या स्वातंत्र्य संग्रामातील अनेक दिग्गज नेत्यांनी देशासाठी अपार योगदान दिले. परंतु यामध्ये लालबहादूर शास्त्री यांचे नाव विशेष आदराने घेतले जाते. भारताचे दुसरे पंतप्रधान म्हणून त्यांनी देशाला नेतृत्व दिले आणि ङ्गजय जवान, जय किसानफ या प्रेरणादायी घोषणेद्वारे संपूर्ण भारताच्या जनमानसात नवी ऊर्जा निर्माण केली. शास्त्रीजींचा जन्म दि. २ ऑक्टोबर १९०४ रोजी उत्तर प्रदेशातील मुगलसराय येथे झाला. योगायोग असा की त्यांचा जन्मदिवस महात्मा गांधी यांच्याच जयंतीसोबत येतो. गांधीजींच्या सत्य, अहिंसा आणि साधेपणाच्या मार्गावर चालत शास्त्रीजींनी आयुष्यभर राष्ट्रहितासाठी अविरत कार्य केले.

शास्त्रीजींचे बालपण अतिशय साधेपणात गेले. लहानपणीच वडिलांचे निधन झाले आणि आईवर कुटुंबाची जबाबदारी आली. परिस्थिती कितीही कठीण असली तरी शिक्षणाची ओढ त्यांना सदैव होती. काशी विद्यापीठात शिक्षण घेताना त्यांनी ङ्गशास्त्रीफ ही पदवी मिळवली आणि त्यानंतर त्यांना लोक ङ्गलालबहादूर शास्त्रीफ या नावाने ओळखू लागले. विद्यार्थी दशेतच त्यांच्यावर महात्मा गांधींच्या विचारांचा प्रभाव पडला आणि त्यांनी स्वातंत्र्य आंदोलनात सक्रिय सहभाग घ्यायचा निर्धार केला.


१९२० च्या दशकात भारतात स्वातंत्र्य चळवळीला जोर आला होता. गांधीजींच्या असहकार आंदोलनाने तरुणाईला नवा उत्साह दिला. शास्त्रीजींनीही सत्याग्रह आणि आंदोलने यात सहभाग घेतला. त्यांना अनेक वेळा तुरुंगवास भोगावा लागला. तुरुंगवासादरम्यान त्यांनी वाचनाचा अभ्यास केला व आपल्या विचारांना अधिक धार दिली. शास्त्रीजींनी काँग्रेस पक्षात काम करताना संघटन कौशल्य दाखवले. साध्या कार्यकर्त्यापासून ते मंत्रीपदापर्यंतचा त्यांचा प्रवास त्यांच्या परिश्रमशील वृत्तीचा आणि प्रामाणिकपणाचा पुरावा देतो. स्वातंत्र्यानंतर शास्त्रीजींना सार्वजनिक जीवनात विविध जबाबदाऱ्या मिळाल्या. ते गृह मंत्रालय, वाहतूक मंत्रालय अशा अनेक विभागांचे मंत्री राहिले. रेल्वेमंत्री असताना घडलेल्या काही मोठ्या रेल्वे अपघातांची जबाबदारी त्यांनी स्वीकारली आणि तत्काळ राजीनामा दिला. भारतीय राजकारणात जबाबदारीची ही भूमिका एक नवा आदर्श ठरला. शास्त्रीजींच्या कामकाजाची शैली साधी, पारदर्शक आणि प्रामाणिक होती. ते नेहमीच सामान्य जनतेच्या हिताचा विचार करत. त्यामुळेच त्यांना लोकांचा प्रचंड विश्वास आणि प्रेम मिळाले.

**पंतप्रधान म्हणून नेतृत्व**

१९६४ मध्ये पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या निधनानंतर लालबहादूर शास्त्री यांची पंतप्रधानपदी निवड झाली. देशासमोर त्या काळात अनेक गंभीर आव्हाने होती. अन्नटंचाई, आर्थिक संकट, सीमावाद, तसेच पाकिस्तानकडून वाढती आक्रमणे अशा परिस्थितीत शास्त्रीजींनी शांत, स्थिर आणि धैर्यशील नेतृत्व दिले. त्यांनी दिलेली ङ्गजय जवान, जय किसानफ ही घोषणा आजही भारतीयांच्या मनात दुमदुमत राहिली आहे. देशाच्या सुरक्षेसाठी सैनिक आणि अन्नपुरवठ्यासाठी शेतकरी हे दोन्ही समाजाचे कणा आहेत, हे त्यांनी या घोषणेद्वारे अधोरेखित केले. अन्नटंचाईच्या काळात त्यांनी स्वतः साधेपणाने राहून लोकांना उपवासाचे आवाहन केले. रविवारी एकवेळ अन्न न घेण्याची त्यांची चळवळ मोठ्या प्रमाणावर यशस्वी ठरली.

**१९६५ चे भारत-पाक युद्ध**

शास्त्रीजींच्या नेतृत्वाखाली भारताने १९६५ साली पाकिस्तानविरुद्धच्या युद्धात शौर्य दाखवले. भारतीय जवानांनी देशाचे रक्षण करताना प्रचंड पराक्रम गाजवला. शास्त्रीजींनी सैनिकांना संपूर्ण पाठिंबा दिला. त्यांच्या प्रेरणादायी नेतृत्वामुळे देशात एकात्मतेची भावना दृढ झाली. युद्धानंतर शांतता प्रस्थापित करण्यासाठी ताश्कंद येथे भारत-पाकिस्तानमध्ये करार झाला. शास्त्रीजींनी शांतता आणि स्थैर्यासाठी तो करार स्वीकारला. परंतु दुर्दैवाने ताश्कंदमध्येच ११ जानेवारी १९६६ रोजी त्यांचे अचानक निधन झाले. त्यांच्या मृत्यूचे कारण आजही रहस्यांनी वेढलेले आहे. लालबहादूर शास्त्रींचे व्यक्तिमत्व साधेपणा, प्रामाणिकता आणि विनयशीलतेचे मूर्तिमंत उदाहरण होते. त्यांचा साधा पोशाख, सामान्य माणसाशी साधलेला सहज संवाद, आणि कधीही न ढळणारी देशनिष्ठा यामुळे ते खऱ्या अर्थाने जनतेचे नेते ठरले. त्यांना सत्ता, प्रसिद्धी किंवा वैभव यात कधीच स्वारस्य नव्हते. राष्ट्रहित हेच त्यांचे अंतिम ध्येय होते.



**वारसा आणि प्रेरणा**

आज शास्त्रीजींचा जन्मदिवस आपल्याला पुन्हा आठवण करून देतो की नेतृत्वात प्रामाणिकपणा, जबाबदारीची जाणीव आणि साधेपणा किती महत्त्वाचा असतो. ङ्गजय जवान, जय किसानफ या त्यांच्या घोषणेला काळाच्या ओघात ङ्गजय विज्ञानफ ही भर पडली असली तरी मूळ संदेश आजही तितकाच जिवंत आहे. शास्त्रीजींनी देशासमोर दिलेला आदर्श म्हणजे कोणतीही अडचण कितीही मोठी असो, ती प्रामाणिकपणे, धैर्याने आणि जनतेच्या सहकार्याने सोडवता येते. त्यांच्या स्मृती भारतवासीयांसाठी सदैव प्रेरणादायी राहतील. लालबहादूर शास्त्री हे नाव घेतल्यावर आपल्या डोळ्यांसमोर एक साधा, परंतु अत्यंत दृढनिश्चयी नेता उभा राहतो. त्यांच्या आयुष्याने दाखवून दिले की राजकारण म्हणजे केवळ सत्ता नाही, तर ती जनतेची सेवा आहे. गांधीजींच्या विचारसरणीवर चालत त्यांनी संपूर्ण आयुष्य देशासाठी वेचले. शास्त्रीजींच्या जयंतीनिमित्त आपण त्यांचा वारसा स्मरून त्यांचे विचार आपल्या जीवनात उतरवण्याचा संकल्प करू या!

# जगभरात गांधीजींच्या नावाचा डंका!

दरवर्षी २ ऑक्टोबर हा दिवस आपल्यासाठी अत्यंत महत्त्वाचा ठरतो. या दिवशी राष्ट्रपिता महात्मा गांधी यांची जयंती साजरी केली जाते. हा दिवस फक्त भारतातच नव्हे तर संपूर्ण जगभर पाळला जातो. संयुक्त राष्ट्रसंघाने देखील २ ऑक्टोबर हा ङ्गआंतरराष्ट्रीय अहिंसा दिनफ म्हणून घोषित केला आहे. यावरून गांधीजींच्या विचारांना मिळालेलं जागतिक महत्त्व स्पष्ट होतं. त्यांच्या जीवनातून, विचारांतून आणि कार्यातून आपल्याला मिळणाऱ्या प्रेरणेची आठवण करून देण्यासाठी हा दिवस विशेष मानला जातो.

मोहनदास करमचंद गांधी यांचा जन्म दि. २ ऑक्टोबर १८६९ रोजी गुजरातमधील पोरबंदर येथे झाला. त्यांचे वडील करमचंद गांधी हे पोरबंदर संस्थानचे दिवाण होते, तर आई पुतळीबाई धार्मिक व सद्गुणी होती. घरातील धार्मिक वातावरणामुळे बालपणापासूनच गांधीजींच्या मनावर प्रामाणिकपणा, सत्य, संयम व अहिंसेचे संस्कार झाले. शिक्षणासाठी त्यांनी इंग्लंडला जाऊन वकिलीचे शिक्षण घेतले. पुढे वकिली करण्यासाठी ते दक्षिण आफ्रिकेत गेले. तिथे त्यांना वर्णद्वेषाचा प्रत्यक्ष अनुभव आला. एका गोऱ्या अधिकाऱ्याने फक्त काळा असल्यामुळे गांधीजींना रेल्वेतून बाहेर फेकून दिले. या घटनेनंतर त्यांनी ठरवले की अन्यायाविरुद्ध आवाज उठवायचा आणि त्यासाठी अहिंसा व सत्याचा मार्ग निवडायचा.

गांधीजींच्या जीवनात ङ्गसत्याग्रहफ हा शब्द फार महत्त्वाचा आहे. ङ्गसत्यफ म्हणजे सत्यावर ठाम राहणे आणि ङ्गआग्रहफ म्हणजे त्यासाठी प्रयत्न करणे. गांधीजींनी अन्यायाविरुद्ध लढताना हिंसेचा मार्ग स्वीकारला नाही, तर सत्याग्रह व अहिंसा या शस्त्रांचा वापर केला. दक्षिण आफ्रिकेत भारतीयांवर होणाऱ्या अन्यायाविरुद्ध त्यांनी केलेला सत्याग्रह यशस्वी ठरला. त्यातून त्यांना समजले की हाच मार्ग भारतात स्वातंत्र्यलढ्यासाठीही प्रभावी ठरेल. भारतामध्ये परत आल्यानंतर गांधीजींनी ब्रिटिश सत्तेविरुद्ध संघर्ष सुरू केला. १९१९ मधील रॉलेट कायद्याविरोधात त्यांनी आंदोलन छेडले. त्यानंतर असहकार आंदोलन, स्वदेशी चळवळ, खादी प्रचार, दांडी यात्रा, भारत छोडो आंदोलन अशा अनेक ऐतिहासिक चळवळींना गांधीजींनी दिशा दिली.



**खादी प्रचार व स्वावलंबन**

गांधीजींना वाटायचे की खरी स्वातंत्र्यप्राप्ती फक्त राजकीय नसेल, तर आर्थिक आणि सामाजिकही हवी. म्हणून त्यांनी चरखा फिरवण्याचे आणि खादी वापरण्याचे आवाहन केले. मिठाच्या कराविरोधात गांधीजींनी केलेली ही ३८६ किलोमीटरची पदयात्रा इतिहासात सुवर्णाक्षरांनी नोंदली गेली आहे. या यात्रेमुळे सामान्य माणसाला देखील स्वातंत्र्यलढ्यात सहभागी होता आले. ङ्गकरो या मरोफ या घोषणेसह गांधीजींनी संपूर्ण देशाला स्वातंत्र्यासाठी एकत्र केले. या आंदोलनामुळे ब्रिटिश सत्तेला भारत सोडण्याशिवाय पर्याय उरला नाही. गांधीजी फक्त राजकीय नेते नव्हते, तर ते एक विचारवंत, समाजसुधारक आणि तत्त्वज्ञ होते. त्यांच्या मते हिंसा ही समस्या वाढवते, तर अहिंसा समाधान देते. गांधीजींनी आपल्या जीवनात सत्याला सर्वोच्च स्थान दिले. त्यांचे ब्रीदवाक्य होते ङ्गसत्य हेच देव आहेफ. अस्पृश्यता व जातीभेदाविरुद्ध त्यांनी सातत्याने लढा दिला. हरिजनांना त्यांनी समाजाचा अविभाज्य भाग मानले. परकीय वस्तूंवर अवलंबून न राहता देशातील प्रत्येकाने स्वदेशी वस्तू वापराव्यात, असा त्यांचा आग्रह होता. गांधीजींनी नैतिक शिक्षणावर भर दिला. पुस्तकांच्या ओझ्यापेक्षा चारित्र्यनिर्मिती अधिक महत्त्वाची असल्याचे ते म्हणत.

**गांधीजींचा जागतिक प्रभाव**

गांधीजींच्या अहिंसा व सत्याग्रहाच्या मार्गाने केवळ भारतालाच नव्हे, तर जगातील अनेक देशांना प्रेरणा दिली. अमेरिकेतील मार्टिन ल्यूथर किंग, दक्षिण आफ्रिकेतील नेल्सन मंडेला यांसारख्या नेत्यांनी गांधीजींच्या विचारांचा स्वीकार करून आपल्या देशातील अन्यायाविरुद्ध यशस्वी लढा दिला. यावरून गांधीजींची तत्त्वं किती सार्वकालिक आहेत, हे स्पष्ट होते. आज भारत स्वतंत्र आहे, पण गांधीजींचे विचार अधिकच महत्त्वाचे झाले आहेत. समाजात हिंसा, भ्रष्टाचार, जातीभेद, प्रदूषण यांसारख्या समस्या वाढत आहेत. गांधीजींनी सांगितलेला अहिंसा, सत्य, स्वावलंबन, साधेपणा आणि नैतिकतेचा मार्ग स्वीकारला, तर या समस्यांवर उपाय शोधता येईल. डिजिटल युगातसुद्धा गांधीजींचे विचार मार्गदर्शक ठरू शकतात.

महात्मा गांधींच्या जीवनातून आपल्याला कळते की महान कार्यासाठी नेहमी हिंसेची गरज नसते. सत्य, अहिंसा, संयम आणि नैतिकता या मूल्यांच्या आधारावरही समाज बदलता येतो, देशाला स्वातंत्र्य मिळवून देता येते आणि जगाला दिशा देता येते. म्हणूनच त्यांना ङ्गमहात्माफ आणि ङ्गराष्ट्रपिताफ हा मान दिला गेला.

दि. २ ऑक्टोबर हा दिवस आपल्याला गांधीजींचे विचार स्मरण करून देतो आणि त्यांची अंमलबजावणी करण्याची प्रेरणा देतो. गांधीजींच्या तत्त्वांना आपल्या दैनंदिन जीवनात उतरवणे, हाच त्यांना दिलेला खरा मान आणि खरी श्रद्धांजली ठरेल.



# विकासाचा वेलू गगनावरी..!

*उत्तर महाराष्ट्रातील एक महत्त्वाचा जिल्हा म्हणून जळगावची ओळख आहे. केळी, सोन्याचा व्यापार तर हा जगप्रसिद्ध आहे. या जिल्ह्याला मुंबईशी थेट विमानाने जोडणे व्यापाऱ्याच्या दृष्टीने खूप गरजेचे होते. पण हा प्रस्ताव प्रशासनाच्या लालफितीत अडकला होता. राज्यात देवेंद्र फडणवीस यांचे सरकार आले आणि जळगाव-मुंबई हे अंतर अवघ्या तासाभरावर आले. याचबरोबर फडणवीस यांनी जलयुक्त शिवार योजनेतून इथल्या शेतकऱ्यांना पिण्याच्या पाण्यासह सिंचनाच्या सोयी उपलब्ध करून दिल्या. यासाठी राज्य सरकारकडून मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध करून देण्यात आला. केंद्र सरकारकडून जळगाव-मनमाडची तिसरी रेल्वे लाईन मंजूर करून त्यासाठी १०३५ कोटी रुपयांचा निधी मंजूर करून आणला होता. जळगाव जिल्ह्यासाठी केलेल्या विविध विकासकामांचा हा आढावा...*

जळगाव आणि मुंबई या दोन शहरांमधील विमानसेवा अनेक दिवसांपासून प्रलंबित होती. यामध्ये विविध प्रकारच्या प्रशासकीय मान्यता हव्या होत्या. त्यातील बऱ्याचशा मान्यता या केंद्र सरकारकडून करून घ्यायच्या होत्या. यामध्ये तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्राधान्याने लक्ष घालून मुंबई आणि जळगाव या दोन शहरांमधीन विमानसेवा सुरू करण्यात महत्त्वाची भूमिका बजावली. त्यानुसार २३ डिसेंबर २०१७ पासून ही विमानसेवा सुरू झाली.

२०१४ मध्ये केंद्रात नरेंद्र मोदी आणि राज्यात देवेंद्र फडणवीस यांचे सरकार आल्यानंतर अनेक प्रकारच्या विकासयोजना राबविण्यात आल्या. केंद्र सरकारच्या अखत्यारित असलेल्या रेल्वे मंत्रालयाने देशभरातील ५०० रेल्वे स्थानकांचे सुशोभिकरण करून त्यांचा कायापालट करण्यासाठी विशेष निधी मंजूर करण्यात आला होता. तसेच या सुशोभिकरणाच्या योजनेत भुसावळ विभागातील भुसावळ, जळगाव, चाळीसगाव या रेल्वे स्थानकांचा समावेश करण्यात आला होता. या रेल्वे स्थानकांवर पायाभूत सेवासुविधा उभारून तिथे एलईडी दिव्यांची रोषणाई करण्यात आली. स्टेशनच्या बाहेर आणि आतमध्ये सर्व ठिकाणी एलईडी दिवे बसवून रेल्वे स्थानकाच्या इमारतीला रंगबेरंगी लायटिंग करण्यात आली. दरम्यान, २०१९ मध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते जळगाव-मनमाडच्या तिसऱ्या रेल्वे लाईनचे भूमिपूजन करून या लाईनसाठी १०३५ कोटी रुपयांचा निधी मंजूर केला होता.

**चार सिंचन प्रकल्पांसाठी ४६५४ कोटी**

तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली ९ सप्टेंबर २०१९ मध्ये झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत जळगावमधील ४ सिंचन प्रकल्पांसाठी जवळपास साडेचार हजार कोटी रुपये मंजूर केले होते. या ४ प्रकल्पांमध्ये वाघूर, हतनूर, वरणगाव आणि शेळगाव बॅरेज या प्रकल्पांचा समावेश होता. या प्रकल्पांसाठी अनुक्रमे २,२८८ कोटी, ५३६ कोटी, ८६१ कोटी आणि ९६९ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला. वाघूर प्रकल्पाला मंत्रिमंडळाने नव्याने मान्यता दिल्यामुळे जळगाव, भुसावळ, जामनेर तालुक्यातील ३६ हजार हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली येत आहे. हतनूरच्या उर्ध्व तापी १ मुळे रावेर, यावल, चोपडा तालुक्यातील १२४ गावातील ३७ हजार ८३८ हेक्टर क्षेत्राला लाभ होत आहे. शेळगांव बॅरेजमुळे यावल तालुक्यातील १९ गावातील ९ हजार १२८ हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली येत आहे. तर वरणगाव तळवेल योजनेमुळे भुसावळ, बोदवड, मुक्ताईनगर तालुक्यातील १६ हजार ९४८ हेक्टर सिंचन क्षेत्रास लाभ होत आहे.

**ब्रॉडगेज रेल्वेमार्गाला गती**

जालना ते जळगाव हा एकूण १७४ किमीचा नवीन ब्रॉडगेज रेल्वे मार्ग उभारण्यासाठी केंद्र सरकारने ३५५२ कोटी रुपयांचा हिस्सा ठरवून दिला होता. त्या खर्चास राज्य सरकारने २८ जून २०२३ रोजी झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता दिली. या रेल्वे मार्गासाठी राज्य सरकार ५० टक्के आणि केंद्र सरकार ५० टक्के निधी देणार आहे.

**बोदवड उपसा सिंचन योजनेसाठी २१७८ कोटी**

जळगाव आणि बुलढाणा जिल्ह्यातील ५३ हजार ४४८ हेक्टर क्षेत्रास सिंचनाची सुविधा निर्माण करण्यासाठी जळगाव जिल्ह्यातील बोदवड परिसर उपसा सिंचन योजनेच्या २१७८.६७ कोटी रुपयांच्या खर्चास मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. ही योजना दोन टप्प्यात राबविण्यास मंजुरी देण्यात आली. राज्य सरकारच्या या निर्णयामुळे जळगाव आणि बुलढाणा जिल्ह्यातील जवळपास ५० हजार हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली येणार आहे.

**समृद्धतून प्रगती**

जळगाव जिल्ह्याच्या नंदगाव येथील सुमनबाई पाटील यांनी सरकारच्या उन्नत शेती समृद्ध शेतकरी अभियान योजनेतून टॅक्टर आणि शेतीसाठी आवश्यक असणारे साहित्य घेऊन आपल्या परिवाराची उन्नती साधली. अनेक शेतकऱ्यांकडे विविध प्रकारची अवजारे विकत घेण्यासाठी निधी नसल्याने, त्यांनी केंद्र सरकारच्या योजनेचा लाभ घेत शेतीतून चांगले उत्पन्न मिळवत आपली प्रगती साधली.


मा.नरेंद्रजी मोदी
(प्रधानमंत्री)
मा.अमितजी शाह
(गृहमंत्री)
मा.जे.पी.नड्डा
(राष्ट्रीय अध्यक्ष)
मा.रविंद्र चव्हाण
(प्रदेशाध्यक्ष)
मा.देवेंद्र फडणवीस
(मुख्यमंत्री)
दैनिक
व्याघ्र शौर्यम
वृत्तपत्रास
हार्दिक शुभेच्छा
महिला सक्षमीकरण
मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना
आरोग्य
आवास
दिव्यांग सबलीकरण
कल्याणकारी योजना
कृषी
बांधकाम कामगार योजना
प्रधानमंत्री नरेंद्रजी मोदी व
मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस
यांच्या नेतृत्वात देशात व महाराष्ट्रात
जन कल्याणकारी योजनाच्या माध्यमातून
शाश्वत विकास हेच ध्येय...
होय
जामनेर बदलंय...
जामनेर
BHUSAWAL
BODVAD
BULDHANA
मा.श्री.गिरीषभाऊ महाजन
मंत्री, जलसंपदा व आपत्ती व्यवस्थापन
महाराष्ट्र राज्य
मा.सौ.साधना गिरीष महाजन
माजी लोकनियुक्त नगराध्यक्षा
नगर परिषद, जामनेर
शुभेच्छूक : सर्व पदाधिकारी व कार्यकर्ते भारतीय जनता पार्टी जामनेर विधानसभा क्षेत्र